

# आयआयएममध्ये झाली कृषितंत्रज्ञान कार्यशाळा

**नागपूर :** दि इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, महाराष्ट्र राज्य कृषी विपणन मंडळ आणि दि एशियन डेव्हलपमेंट बँक यांच्यावतीने दोन दिवसांच्या कृषी तंत्रज्ञान कार्यशाळा आणि ग्राहक-विक्रेते संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कृषी उत्पादक संघांना बळ देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण तसेच विविध प्रकारे मार्गदर्शन या कार्यशाळेमार्फत करण्यात आले. आयआयएम, नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांच्यासह अन्य मान्यवर आणि तज्ज्ञांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. आयआयएम, नागपूरच्यावतीने सप्टेंबर, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांत अशा प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या. नागपूर आणि परिसरातील अनेक शेतकरी या कार्यशाळांमध्ये सहभागी झाले होते.